# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**झोपडपट्टी पुनर्विकास (एसआरए) प्रकल्पात आशयपत्र व बँकेकडून कर्ज घेऊनही प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१) ३२५६४ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर उपनगरातील झोपडपट्टी पुनर्विकास (एसआरए) प्रकल्पात आशयपत्र आणि बँकांकडून कर्ज घेऊनही सुमारे ५० हजार कोटी रुपयाची गुंतवणूक केलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास (एसआरए) प्रकल्पाचे काम विकासकांनी प्रलंबित ठेवल्या प्रकरणी सदरहू प्रकल्प ताब्यात घेऊन स्वत: एसआरए प्राधिकरण प्रकल्प राबवून रहिवाशी कुटुंबांना घरे देणार असल्याचे आश्वासन मा.मंत्री महोदयांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प प्रलंबित असल्याने हजारो लोक आज रस्त्यावर असून त्यांना भाडेही मिळत नसल्याने त्यांच्यावर आलेली बेघर होण्याची वेळ विचारात घेता उक्त प्रलंबित झोपडपट्टी पुनर्विकास (एसआरए) प्रकल्प त्वरीत ताब्यात घेऊन स्वत: राबविणेबाबत शासन तथा एसआरए प्राधिकरणाने अद्याप कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, माहे नोव्हेंबर,२०२१ अखेरपर्यंत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२(३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबईतील एकूण ३८० झोपडपट्टी पुनर्वसन योजना विविध कारणांमुळे रखडलेल्या आहेत.

मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी योजनांना गती देण्यासाठी सदर योजनांमध्ये निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे तसेच अभय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या संयुक्त भागीदारीतून योजना राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

याचबरोबरच रखडलेल्या झोपडपट्टी योजनांना गती देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

(१) पुनर्वसन सदनिकाच्या देखभाल खर्चापोटी भरावी लागणारी रक्कम ४०,०००/- ही पुनर्वसन इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करतेवेळी एकरकमी घेणे.

(२) खाजगी मालकीच्या भूखंडावर बँकेच्या ५% हमीपत्राऐवजी २% हमीपत्र घेणे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस आशयपत्र व मंजूर आराखडे एकाचवेळी निर्गमित करणे.

(४) जलदगतीने योजनांना मंजूरी देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण Auto DCR संगणकीय प्रणाली विकसित करणे.

(५) सार्वजनिक मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्याची १०:१०:८० या पध्दतीने आकारणी करणे.

(६) कोर्टाच्या आदेशाशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्तरावरुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारतीच्या बांधकामास स्थगिती न देणे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नांदेड येथे सिडको प्रकल्प अंतर्गत पोलीस वसाहतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) ३२६०४ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे जिल्हा पोलिसांसाठी नव्या पोलीस वसाहतीकरिता सिडको प्रशासनाच्या मोढा प्रकल्पांतर्गत गट नं.३० मधील जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव येथील पोलीस प्रशासनाने शासनास सादर केला असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पास शासनाने मान्यता देऊन येथील पोलीस वसाहतीसाठी सदरील जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२(२) :**(१) व (२) नाही.
नांदेड येथे जिल्हा पोलिसांसाठी नव्या पोलीस वसाहतीकरिता सिडको प्रशासनाच्या मोढा प्रकल्पांतर्गत गट नं.३० मधील जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला नसून
तत्कालीन पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कार्यकारी संचालक, सिडको, नवी मुंबई यांना पोलीस कर्मचारी यांचेकरीता त्यांचे मालकीचे ८०० ते १००० चौ.फुटांची घरे बांधुन मिळणेसाठी पत्र दिले होते.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मुंबईत विविध कारणांमुळे प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पाबाबत**

**(३) ३२८३२ (११-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत विविध कारणांमुळे रखडलेल्या सुमारे पाचशे योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ताब्यात घेणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. हे खरे हे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात ७८० योजना रखडली असल्यामुळे अडीच लाख झोपडीवासीयांवर बेघर होणाऱ्या असल्याची बाब दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजी उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मंजुरी मिळालेल्या ७८० योजना प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त अडीच लाख बेघर होणाऱ्या झोपडीवासीयांना त्यांना हक्कांची घरे मिळण्याबाबत शासनाकडून कोणती तातडीची उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय,
(६) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :** (१) (२) व (३) एकूण ३८० पुनर्वसन झो.पु. योजना विविध कारणांमुळे रखडलेल्या आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे अशा रखडलेल्या झो.पु. योजनांना गती देण्याकरिता शासनाने धोरण निश्चित केले आहे.
(४) व (५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीमान करण्याकरिता खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत-

१)पुनर्वसन सदनिकाच्या देखभाल खर्चापोटी भरावी लागणारी रक्कम ४०,०००/- ही पुनर्वसन इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करतेवेळी एकरकमी घेण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कार्यालयीन आदेश निर्गमित केलेला आहे.

२) खाजगी मालकीच्या भूखंडावर ५% बँकेच्या हमीपत्राऐवजी २% हमीपत्र घेण्याबाबत परिपत्रक क्र. १८८-सी निर्गमित करण्यात आलेले आहे.

३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस आशयपत्र व मंजूर आराखडे एकाचवेळी निर्गमित करण्याकरीता कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

४)जलदगतीने योजनांना मंजूरी देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण Auto DCR संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

५) सार्वजनिक जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी जमिनीचे अधिमूल्य १०:१०:८० या पध्दतीने आकारणी करण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

६)कोर्टाच्या आदेशाशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्तरावर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारतीच्या बांधकामास स्थगिती न देण्याचे धोरण अवलंबलेले आहे.

७)झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे अशा रखडलेल्या झो.पु. योजनांना गती देण्याकरिता शासनाने धोरण निश्चित केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**नवा मोंढा (जि.नांदेड) येथील शंकर नागरी सहकारी बँकेचे खाते हॅक करण्याबाबत**

**(४) ३२८८३ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवा मोंढा (जि.नांदेड) येथील परिसरात मुख्यालय असलेल्या शंकर नागरी सहकारी बँकेचे खाते हॅक करुन १४ कोटी ४६ लाख ५ हजार ३४७ रुपये आयडीबीआय बँकेच्या कर्नाटकातील वजिराबाद शाखेने एनईएफटी व आरटीजीएसद्वारे संशयास्पदरित्या काही व्यक्तींच्या खात्यावर जमा (वळते) केल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सहकारी बँकेच्या व्यवस्थापनाने वजिराबाद, कर्नाटक व शिवाजीनगर, नांदेड येथील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) होय हे खरे आहे.

शंकर नागरी सहकारी बँक, नवा मोंढा, जिल्हा नांदेड या बँकेचे आय.डी.बी.आय. शाखा लाहोटी कॉम्प्लेक्स वजिराबाद, जिल्हा नांदेड या बँकेत पुल खाते असून सदर खात्यावरुन रुपये १४,४६,०५,३४०/- इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने वैयक्तीक डेटा / माहिती चोरुन अज्ञात व्यक्तीने बँकेतील रकमा परस्पर वळत्या करुन घेऊन बँकेची ऑनलाईन फसवणुक केली आहे.

(२) सदर प्रकरणी बँकेचे कार्यकारी अधिकारी जनरल मॅनेजर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे गु.र.नं.१२/२०२१, कलम ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७१,१२० (ब) भा.द.वि. सहकलम ४३, ६६, ६६ (क), ६६ (ड), माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००५ अन्वये दिनांक ११.०१.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाची तक्रार पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड येथे दाखल करण्यात आलेली नाही.

(३) सायबर पोलीस स्टेशन, नांदेड यांनी सदर गुन्हयाचा तपास केला आहे. सदर गुन्ह्यात भारतातील २० राज्यातील एकूण १७० आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी १७ आरोपी अटक करण्यात आले आहेत.

सदर गुन्ह्यात शंकर नागरी सहकारी बँकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल व बँकेतील संगणकातील हार्ड डिस्क, तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून त्यांचे मोबाइल व लॅपटॉप परीक्षणासाठी जप्त करुन न्यायसहाय कक्ष, वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना मुंबई येथे पाठविण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या १७ आरोपींकडील रु.१,३७,२२०/- इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली असून त्यांच्या बँक खात्यातील एकूण रु.१,६५,६१,२५८/- इतकी रक्कम गोठविण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## वनीखुर्द (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथे जादूटोणा करुन महिलांवर व वयोवृद्धांला मारहाण केल्याबाबत

**(५) ३२९८६ (१०-०१-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनीखुर्द (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथे जादूटोणा केल्याच्या संशयावरून गावातील लोकांनी दलित समाजातील महिलांवर व वयोवृद्धांना हातपाय बांधून मारहाण केल्याची घटना दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेतील पिडित गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२(३) :**(१) होय.

(२) होय,

(३) व (४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, जिवती येथे अपराध क्र. ५४/०२१ कलम ३५४ (ब), ३२६, ३२५, १४३, १४७, १४९, ३४२ भादंवि सह कलम ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोना यांना प्रतिबंधक घालण्याबाबत व त्याचे मुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३, सह कलम ३ (२)(va), ३ (२)(v), ३(१)(r) ३(१)(z-b) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ४५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे तसेच एक विधीसंघर्षीत बालक आहे. सदर गुन्ह्यातील १३ आरोपी फरार आहेत. सदर आरोपीविरुध्द दि. १६.१०.२०२१ अन्वये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

विधी संघर्षित बालक यांचे विरुध्द मा. बाल न्यायालय येथे दि. १६.१०.२०२१ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.नळेगांव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(६) ३३०६१ (१०-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.नळेगांव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे १४ वर्षांपूर्वी झालेल्या दंगलीमुळे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथील विवेकानंद चौक येथे तसेच पोलीस ठाणे करण्याबाबतचा प्रस्ताव देखील शासनाकडे पाठविण्यात आला असता स्वतंत्र पोलीस ठाणे अद्याप सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त लोकवस्तीत २५ हजार गाव असून दर मंगळवार व रविवार बाजार भरुन मोठ्या प्रमाणात महिलांच्या तक्रारी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात असताना जोडलेल्या चाकूर पोलीस ठाण्याअंतर्गत दूरसेवा कार्यालयाऐवजी १४ वर्षापासून स्वतंत्र पोलीस ठाण्याची मागणी करण्यात येत असताना अद्याप स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२३) :** (१), (२),(३) व (४) पोलीस अधीक्षक, लातूर यांचे आस्थापनेवर दिनांक ४/३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे पोलीस ठाणे, विवेकानंद चौक निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

तसेच,महाराष्ट्र पोलीस दलाचा एकत्रित आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यावर निर्णय झाल्यानंतर नळेगांव पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गारगोटी पोलीस ठाणे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या नवीन पोलीस ठाणे इमारत बांधकामाकरिता निधी मंजुर करण्याबाबत

**(७) ३३१६५ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी पोलीस ठाणे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या नवीन पोलीस ठाणे इमारत बांधकामाकरीता निधी मंजुर करण्याबाबत गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य (ग्रामिण) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय, मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीकरीता सन २०१७ या कालावधीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधीची तरतुद करण्याबाबत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य महोदय यांचेकडे निधीकरीता लेखी निवेदनाव्दारे मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणी केल्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :**(१) (२) व (३) होय, मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे अध्यक्षेतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

गारगोटी पोलीस ठाणे, तालुका- भुदरगड, जिल्हा- कोल्हापूर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सदरच्या प्रकल्पास महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्रकल्पाच्या नकाशे व आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली अहे.

तसेच शासन पत्र, गृह विभाग, दिनांक १२.०१.२०२२ अन्वये शासनाने ८७ पोलीस ठाणे यांच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रकल्पाच्या प्राधान्यक्रम यादीस शासनाने मान्यता दिली आहे. सदर यादीमध्ये गारगोटी पोलीस ठाणे बांधकाम या प्रकल्पाचा समावेश आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कामे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नायगाव नवीन पोलीस वसाहत इमारतीत राहणा-या कर्मचा-यांना इमारत रिक्त करण्याबाबत

**(८) ३३२७७ (०७-०१-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव नवीन पोलीस वसाहत इमारत क्र.ए व जी आणि इतर इमारतींच्या दुरुस्तीचे कारण दाखवून प्रशासनाकडून इमारतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना इमारत रिक्त करण्याच्या सूचना प्रशासनाकडून लेखी आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती या चांगल्या असून त्यांची दुरुस्ती करुन राहण्यासाठी योग्य असल्याचे संरचनात्मक लेखा परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) रिपोर्टमध्ये सांगण्यात आल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारत धोकादायक असल्याचे जाहिर करण्याचे कारण काय, तसेच सदर वसाहतीमधील इमारती रिक्त करुन संबंधितांकडून पर्यायी सूचविलेल्या इमारती या जुन्या व राहण्या योग्य नसल्याचे समजते त्यामुळे पर्यायी सुचविण्यात आलेल्या इमारतींचे देखील संरचनात्मक लेखा परीक्षा (स्ट्रक्चरल ऑडीट) झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१), (२) व (३) नायगाव नवीन पोलीस वसाहतीमधील नमूद इमारतीचे संरचनात्मक परिक्षण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले असुन त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारत क्र.बी, डी, ई, जी, एच (B,D,E,G,H) या पाच इमारती धोकादायक असल्याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार उक्त पाच इमारतीची स्थिती गंभीर असुन, त्या दुरुस्ती करणेपलीकडच्या व राहण्यास योग्य नसल्याने रिकाम्या करुन पाडणेबाबत अहवालात नमूद केले आहे. तसेच काही दिवसांत पावसाळा चालु होणार असल्याने इमारत धोकादायक स्थितीत असल्याने इमारतीमध्ये काही दुर्घटना होऊ नये याकरिता सदर इमारती रिकाम्या करण्याची कार्यवाही करणेबाबत उक्त अहवालाद्वारे कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने जीवीत व वित्त हानी होवु नये म्हणुन सदर पाच इमारती रिक्त करण्याच्या सूचना रहिवाशांना देण्यात आल्या. इमारत क्र. अ (A) बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

वरील पाच इमारतीमध्ये एकूण १२० निवासस्थाने असून इमारतीतील रहिवाशांना पर्यायी निवासस्थाने देण्यासाठी प्रथम प्राधान्य मिळावे म्हणून निवासस्थान वाटपाची ई-आवास प्रक्रिया माहे जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२१ अशी ३ महिने स्थगित करुन रहिवाशांना त्यांच्या पसंतीनुसार पर्यायी निवासस्थान मागणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. कर्मचाऱ्यांनी पर्यायी निवासस्थानांची पाहणी करुन मागणी केल्याने एकूण ४७ कर्मचाऱ्यांना त्यांच्या पसंतीनुसार पर्यायी निवासस्थानांचे वाटप केले असुन त्यापैकी ३२ कर्मचाऱ्यांनी निवासस्थानाचा ताबा घेतला आहे आणि १५ कर्मचाऱ्यांनी ताबा घेतलेला नाही.

पर्यायी निवासस्थाने असलेल्या इमारती धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने अथवा कर्मचाऱ्यांनी कळविलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील वीज कामगार, अभियंते, अधिकारी, तात्पुरत्या स्वरुपातील कामगार यांना पहिल्या फळीतील कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबत

**(९) ३३३०० (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील वीज कामगार, अभियंते, अधिकारी, तात्पुरत्या स्वरुपातील कामगार यांना पहिल्या फळीतील कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा (फ्रंट लाइन वर्कर) व इतर मागण्यांसाठी वीज कर्मचारी अभियंते संघटना

संयुक्त कृती समितीने दिनांक २५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास कामबंद आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या तिन्ही कंपनीतील वीज कर्मचाऱ्यांना फ्रंटलाइन वर्कर्स प्रमाणे दर्जा देऊन या तीनही कंपन्यांतील अधिकारी/कर्मचारी यांचे लसीकरण प्राधान्याने करण्यात यावे असे जिल्हाधिकारी, जळगाव यांना आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार महावितरण कंपनीच्या नियमित व बाह्यस्त्रोताद्वारे कार्यरत कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांचे ९५%, महानिर्मिती कंपनीतील नियमित कर्मचारी यांचे ९७.७४% व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांचे ९२.२५% व महापारेषण कंपनीतील नियमित/बाह्यस्त्रोतातील कर्मचारी/अधिकारी यांचे ९०% लसीकरण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील ओझरखेडा धरण बांधकामाची निकृष्टता व अनियमिततेबाबत**

**(१०) ३३३१३ (०५-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर मतदार संघातील वरणगांव तळवेळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत ओझरखेडा धरण बांधकामाची निकृष्टता व अनियमिततेबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार लेखी निवेदनाद्वारे मा. जलसंपदा व लाभक्षेत्र मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागणीसंर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तालुका जिंतूर (जि.परभणी) येथील येलदरी धरण क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व शासकीय विश्रामगृह यांच्या सोयी-सुविधांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(११) ३३३७३ (०५-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुका जिंतूर (जि.परभणी) येथील येलदरी धरण क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने देखभाल दुरुस्ती अभावी तर शासकीय विश्रामगृह व जवळील बगीचा ही अत्यंत दुरावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरण परिसरात पर्यटक नेहमी येत असल्याने तेथे कोणत्याही पायाभुत विशेष सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याचे समजते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धरण क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने शासकीय विश्रामगृह यांच्या सोयी-सुविधां त्वरीत करण्याबाबत कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :**(१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
येलदरी धरण ठिकाणी जलविद्युत प्रकल्प असल्याने शासन परिपत्रक क्र. नौविप-२००३/१३५९/(१५/०३)/ सिंव्य (म) दि.०८.१२.२००३ अन्वये जलविद्युत प्रकल्प असलेल्या धरण ठिकाणी नौकायनास बंदी असल्याने धरणातील बेटावर पर्यटन विकास कामे करण्यात आलेली नाहीत.
सद्य:स्थितीत धरण परिसरात इतर पर्यटनाच्या अनुषंगाने जलाशयाच्या किनारपट्टी लगतच्या जलसंपदा विभागाच्या जमिनीवर वनविभाग मार्फत इको पर्यटन योजनेअंतर्गत कामे करण्याकरीता विभागीय वन अधिकारी (प्रा.) परभणी यांनी दि.१८.१०.२०२२ च्या पत्रान्वये धरण परिसरातील मौ.मुरूमखेडा येथील १२.५० हे. व मौ.किन्ही येथील १६.०० हे. क्षेत्रावर इको टुरीझम वनपर्यटन योजनेअंतर्गत कामे करण्यासाठी जलसंपदा विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राकरीता क्षेत्रीय कार्यालयास मागणी केली आहे. उपरोक्त मागणीचे अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) धरणक्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांची निवासस्थाने, शासकीय कार्यालय व विश्रामगृहाची आवश्यक देखभाल दुरुस्ती कामे निधी उपलब्धतेनुसार क्षेत्रीय स्तरावरून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## असंघटित क्षेत्रातील कामागरांना म्हाडा सोडतमध्ये स्वातंत्र आरक्षण देण्याबाबत

**(१२) ३३४९० (११-०१-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई म्हाडाच्या सोडतीद्वारे असंघटित क्षेत्रातील कामागरांना अर्थात मजूर, भाजीवाले, फेरीवाले, रिक्षावाले यांच्यासह तृतीयपंथी, ज्येष्ठ नागरिक आणि ॲसिड हल्ल्यातील महिलांसाठी स्वतंत्र आरक्षण (राखीव घरे) देण्याची शिफारस म्हाडा सोडत निकष समितीने केली असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासह अन्य काही महत्वाच्या शिफारशीची अंमलबजावणी मागील सात वर्षापासून होऊ शकलेली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने असंघटित क्षेत्रातील कामगार अर्थात मजूर, भाजीवाले, रिक्षावाले, फेरीवाले, ज्येष्ठ नागरिक व अन्य घटक वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२२ मध्ये निघणार्या मुंबई मंडळाच्या सोडती पासून या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येणार काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) व (२) म्हाडामार्फत घरांच्या वाटपासाठी काढण्यात येणाऱ्या सोडतीमध्ये सुधारणा करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार म्हाडा सोडतीमधील निक षा त सुधारणा / बदल करण्याची बाब म्हाडा प्राधिकरण स्तरावर विचाराधीन आहे.
(३) म्हाडामार्फत घरांच्या वाटपासाठी काढण्यात येणाऱ्या सोडतीमध्ये अत्यल्प उत्पन्न गट , अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटात सोडतीद्वारे सदनिकांचे वाटप करण्यात येते . सदर सोडतीमध्ये उत्पन्नाच्या निकषानुसार असंघटीत क्षेत्रातील व्यक्ती सोडतीच्या निकषानुसार अर्ज करण्यास पात्र ठरतात. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या अर्जदारास प्रचलित पध्दतीने सदनिका वाटपाची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावरुन करण्यात ये ते .
(४), (५) व (६) म्हाडास्तरावर स्थापित केलेल्या समितीने म्हाडाकडे सादर केलेला अहवाल आवश्यक कार्यवाहीसाठी म्हाडाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

---

**निलंगा ( जिल्हा लातूर) येथील पोलीस वसाहतीच्या बांधकामाबाबत**

**(१३) ३४०१७ (०७-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा येथील पोलीस निवासस्थानाच्या बांधकामाचा प्रस्ताव आपल्या विभागाकडे सादर झाल्याचे तसेच निलंगा मतदार संघात असलेल्या देवणी पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ३५ वर्षापूर्वी वसाहत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधण्यात आलेल्या वसाहतीची आता दुरावस्था झालेली असून ज्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंब सदस्यांची संख्या अधिक आहे त्यांना निवासस्थाने अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांना योग्य निवासस्थाने मिळण्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, देवणी येथे नवीन पोलीस वसाहत बांधण्यास मंजूरी देवून आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :**(१) (२) (३) व (४) होय

निलंगा जिल्हा-लातूर येथील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थान बांधकामाबाबतचा प्रस्तावास मान्यता दिली आहे. तसेच व्यवस्थापन सल्लगार म्हणून मे. गार्गी एंटरप्रायजेस, पुणे ची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच देवणी येथील सेवा निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत बांधलेले गाळे / सदनिका विकण्याच्या १० वर्षे मुदतीच्या तरतुदीत सुधारणा होण्याबाबत**

**(१४) ३४२९२ (११-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील झोपडपट्टी पूर्नवसन प्राधिकरण मार्फत बांधलेले गाळे विकण्याच्या १० वर्षे मुदतीच्या तरतुदीत सुधारणा होण्याबाबत लोकप्रतिनिधीनि मागणी केली हे खरे आहे का,

(२) तसेच, या गाळे विकण्याच्या १० वर्षे मुदतीची मर्यादा कमी करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करून गृहनिर्माण मंत्र्याच्या अध्यक्षते खाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत केली हे खरे आहे का,

(३) असल्यास, या मंत्रिमंडळ उपसमिती ने कोणती शिफारस केली किंवा कसे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे .

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित केलेल्या सदनिका विकण्याचा कालावधी कमी करण्याच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी तत्कालीन मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 09 मार्च, २०२१ रोजी मंत्रिमंडळ उपसमितीचे गठण करण्यात आले .

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र लाथार्थ्यांना त्यांच्या पुनर्वसन सदनिका १० वर्षाच्या आत विकण्यास परवानगी देण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमितीने शासनास शिफारस केली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड ( पूर्व ) पी.एम.जी.पी वसाहतीच्या प्रलंबित पुनर्विकासाबाबत

**(१५) ३४३२३ (११-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड ( पूर्व) येथील सर्वे नं . ३७६ ,पी . एम . जी . पी . वसाहतीतील ५५ इमारतीचा पुनर्विकासाचे काम प्रलंबित आहे हे खरं आहे का,

(२) तसेच , रहिवाश्यांच्या करीना बांधलेला संक्रमण शिबीराची अवस्था वाईट असून इमारत धोकादायक आहे त्यामुळे येथील नागरीकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केल आहे का,

(३) असल्यास, तसेच जे नागरीक विकसकांकडुन भाडे घेऊन इतर ठिकाणी राहतात अशा नागरीकांना वेळेवर भाडे मिळण्यासाठी “ म्हाडाने कार्यवाही केली आहे का ,

(४) तसेच या पुनर्विकासा तील इमारतींचे बांधकाम कधी पूर्ण होईल,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) पी.एम.जी.पी. मुलुंड या वसाहतीच्या पुनर्वसन प्रकल्पातील एकूण ५५ इमारतीमधील १४६७ गाळेधारकांपैकी सन २०१६ मध्ये ७८९ सभासदांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. तर उर्वरित ६९८ सभासदांचे पुनर्वसन अद्यापही प्रलंबित आहे. सद्य:स्थितीत २ पुनर्वसन इमारतीचे काम सन-२०१७ पासून बंद आहे.

(२) मुंबई मंडळाकडे प्राप्त झालेल्या संरचनात्मक अहवालामध्ये (Structural Audit Report) संक्रमण शिबीराची अवस्था धोकादायक आहे. वरील ६९८ सभासदांपैकी संक्रमण शिबीरात राहणाऱ्या ३७७ सभासदांपैकी ४९ सभासदांनी त्यांच्या संक्रमण सदनिकांचा ताबा विकासकास दिलेला आहे. उर्वरित ३२८ सदनिकांधारकाविरुध्द निष्कासनाची कार्यवाही म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत सुरु आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकल्प राबविण्यासंदर्भांत मे.रिचा रिअल्टर्स आणि टाटा हाऊसिंग डेव्हलपमेंट कंपनी लि., यांच्यामध्ये दि.२५/५/२०२२ रोजी सामंजस्य करारनामा झाला आहे. सदर करारनाम्यानुसार, आवश्यक त्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम २४ महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच, सभासदांचे मासिक भाडे देणे, कॉपर्स फंड अदा करणे इत्यादीबाबतची जबाबदारी संबंधित विकासकांनी घेतलेली आहे.

---

## कोल वॉशरीजच सुविधा नसतांना महाराष्ट्र राज्य खनिकर्म विकास महामंडळाला महाजेनकोने दिलेल्या कामाबाबत.

**(१६) ३४३८८ (१२-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाजेनकोने महाराष्ट्र राज्य खनिकर्म विकास महामंडळाला कोल वॉशरीजचे काम दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य खनिकर्म विकास महामंडळाकडे स्वत:ची कोल वॉशरीची सुविधा नसतांना कोणाच्या आदेशाने महामंडळाला कोल वॉशरीचे काम देण्यात आले,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

महाजेनकोने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला वॉश कोल पुरविण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून काम दिले आहे.

(२) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने (MSMC) त्यांना लघु आणि मध्यम कोळसा ग्राहकांना कोळसा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने, नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केल्याचे महाजेनकोस कळविले होते. महाजेनकोला आवश्यक मात्रा व गुणवत्तेचा कोळसा पुरविण्याचे एमएसएमसी (MSMC) ने महाजेनकोला कळविले होते. तसेच, आवश्यकता भासल्यास कोळसा वॉशरी उभारण्याची तयारी दर्शविली. एमएसएमसी (MSMC) हा महाराष्ट्र सरकारचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे, आवश्यक त्या मात्रा व गुणवत्तेचा धुतलेला कोळसा पुरविण्याचा खात्रीलायक पर्याय

म्हणून त्यानुसार महाजेनकोच्या संचालक मंडळाने निर्णय घेऊन डब्लु सी एल (WCL), एस ई सी एल (SECL) आणि एमसीएल (MCL) यांच्या खाणीतील कोळसा उचलून, वॉशरीमध्ये वॉश केलेला कोळसा महाजेनकोच्या विविध औष्णिक वीज केंद्राना पुरविण्यासाठी एमएसएमसी (MSMC) ची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केली.

(३) मंत्री (उद्योग व खनिकर्म) यांनी दि.०३.०३.२०२० रोजी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने एमएसएमसी (MSMC) निविदा प्रक्रियेची कशी करण्याकरीता खालीलप्रमाणे समितीची नियुक्ती केली.

१. प्रधान सचिव, ( उद्योग व खनिकर्म ) - अध्यक्ष

२. प्रधान सचिव, ( ऊर्जा विभाग ) - सदस्य

३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, (महानिर्मिती) - सदस्य

४. उपसचिव (खनिकर्म), उद्योग विभाग - सदस्य सचिव

समितीची व्याप्ती व कार्यकक्षा पुढीलप्रमाणे होती -

अ) महाजेनकोकडून महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला कोल वॉशरीजकरिता नोडल एजन्सी नियुक्त करण्याबाबतचे औचित्य तपासणे .

आ) सदर निविदेसंदर्भात विहित मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कोल वॉशरीजची निविदा प्रक्रिया झाली किंवा कसे याबाबत तपासणी करणे.

इ) सदर निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त कोल वॉशरीजचे न्यूनतम दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करणे.

ई) सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारताना उपस्थित केलेल्या अन्य मुद्यांची माहिती घेऊन ते तपासणे.

सदर चौकशी समितीचा अहवाल दि. १५.०९.२०२० रोजी महाजेनकोला प्राप्त झाला व अंमलबजावणीसाठी एमएसएमसी (MSMC) ला अवगत करण्यात आला. समितीने सुचविलेल्या निरीक्षणे आणि सुचनांना महाजेनकोने सहमती दर्शविली आणि आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. महाजेनकोने दिनांक १०.१२.२०२०, ०७.०६.२०२१, २१.०६.२०२१ व १८.११.२०२१ रोजी डब्ल्यू.सी.एल, एस.ई.सी.एल. आणि एम.सी.एल. यांच्या खाण क्षेत्रातील एकुण २१.७९८ द.ल.मे.टन. कच्चा कोळसा धुवून तो महाजेनकोच्या विविध औष्णिक विद्युत केंद्रांना पुरवठा करण्यासाठी एम.एस.एम.सी. सोबत करार करण्यात आले आहेत, त्यानुसार दि. ८ मार्च २०२१ पासून कच्चा कोळसा खाणीतून उचलून वॉश कोल महाजेनकोला पुरवठा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे .

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## जोगेश्वरी (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील पोलीस वसाहतीचे पुनर्विकास करण्याबाबत

**(१७) ३५५१६ (०७-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील म्हाडा वसाहत तसेच वनराई येथे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासांठी ३० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या वसाहतीमधील इमारती या अत्यंत जीर्ण झाल्याने येथील सदनिकांचे छत कोसळून अपघात झाल्याच्या घटना घडल्या असून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय जीव मुठीत घेवून वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या इमारतीच्या खांबांना व पाण्याच्या टाक्यांना तडे गेलेले असून भुयारी गटाराची (ड्रेनेज) दुरावस्था झाल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून या इमारती केव्हाही कोसळून अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीर्ण झालेल्या या इमारती पाडून त्या ठिकाणी पुनर्विकासाच्या माध्यमातून नव्या इमारती बांधण्याची मागणी येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांकडून शासनाकडे सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त ठिकाणी पुनर्विकासाच्या माध्यमातून नवीन इमारतींचे बांधकाम केल्यास शासनास वाढीव सदनिका उपलब्ध होवून शासकीय निवासस्थानाच्या प्रतिक्षेत असलेल्या अन्य पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सदनिका उपलब्ध होणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुनर्विकासाच्या माध्यमातून नविन इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :**(१) व (२) एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत असलेले न्यु म्हाडा पोलीस वसाहती मधील काही रूमच्या छतांचा काही भाग कोसळला होता. त्याबाबत सदर रूमच्या तात्काळ दुरुस्ती करून मिळणे करीता उप विभागीय अभियंता, (सार्वजनिक बांधकाम विभाग), अंधेरी (पश्चिम), मुंबई कार्यालयास एमआयडीसी पोलीस ठाणे कडून पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

परिमंडळ - १२ च्या अधिपत्याखालील वनराई पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता म्हाडा पोलीस वसाहत क्र. २ व ३ असुन सन २०१९ मध्ये इमारत क्र. २, रूम नं २६३ चा छताचा भाग अचानक पडल्याने रहिवाशी यांना मुकामार व किरकोळ जखम झालेली आहे.

एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत असलेले न्यु म्हाडा पोलीस वसाहती मधील इमारतीच्या खांबाना तसेच पाण्याच्या टाक्यांना तडे गेलेले नाहीत तसेच भुयारी गटाराची (ड्रेनेज) दुरावस्था |झाल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले नाहीत. इमारत सुस्थित आहे.

वनराई पोलीस ठाणे अंतर्गत म्हाडा पोलीस वसाहत क्र. २ व ३ च्या खांबाना तसेच पाण्याच्या टाक्यांना तडे गेलेले नसुन भुयारी गटारी (ड्रेनेज ) नादुरूस्त आहेत. परंतु सदर बाबत वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधुन साफसफाईचे काम करण्यात येत असते. सदर परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले नाही. सदर इमारत कोसळून अपघात होण्याची शक्यता दिसून येत नाही. परंतु इमारतीची तांत्रिक विशेषतज्ञ यांचेमार्फत तपासणी करून स्ट्रक्चर ऑडिट करण्यात आले आहे. वनराई पोलीस वसाहत बिल्डींग नं. २ व ३ या इमारतीचे संरचनात्मक परिक्षण केलेले आहे.
(३), (४) व ५)

मुंबई मधील विविध २७ ठिकाणी म्हाडा वसाहतीतील जीर्ण झालेल्या पोलीस वसाहतीचा पुर्नविकास म्हाडामार्फत करण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून या संदर्भात कारवाई सुरु आहे.

---

## खामगाव (जि.बुलढाणा) शहर पोलीस स्टेशन अंतर्गत m-case १/२०११ या गुन्ह्याचा तपास प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ३५६७४ (०७-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव शहरात पोलीस स्टेशन अंतर्गत m-case १/२०११ या गुन्ह्याचा तपास सन २०११ या कालावधीपासून १० वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाचे आरोपपत्र तयार होऊन ते मा.न्यायालयासमोर सादर करण्यात आलेले नसून स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तपास स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडे देण्याबाबतची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याप्रकरणी तपासास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) सदर गुन्हयाचा तपास सखोल व बारकाईने होणेकरीता स्थानिक गुन्हेशाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.
(४) सदर गुन्हयातील आरोपी तत्कालीन नगरपालिका अध्यक्षा यांचा अति. सत्र न्यायालय खामगांव यांचेकडून अटकपूर्व जामिन मंजूर आहे. तसेच सदर गुन्हयातील तपासामध्ये तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या विरूध्द पुरावे मिळून आल्याने, त्यांचा शोध घेवून त्यांना मा. न्यायालय समक्ष हजर करून दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिरपूर (जि.धुळे) तालुक्यात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१९) ३५७१७ (१०-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरपूर (जि.धुळे) तालुक्यात मागील काही दिवसांपासून स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक यांच्या आशीर्वादाने गैरव्यवहार करुन चोऱ्या, महिलांच्या गळयातील चेन हिसकावून घेणे, पॉकेट मारी, नशेच्या गोळयांचा व्यापार, तीन पत्ती जुगार, जन्ना मन्ना, सट्टापिढ्या, भांग आणि गांजा विक्री, पोलीस व डॉक्टरांच्या घरात चोऱ्या तसेच चारण मोहल्ला येथे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणातील गुन्हे शाखा (एलसीबी) पोलीस निरीक्षक यांच्या आशीर्वादाने उक्त अवैध गैरव्यवहारांच्या प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पोलीस निरीक्षकांच्या बदलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे नाही.
स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांच्याकडून माहे जानेवारी २०२० ते माहे नोव्हेंबर २०२१ अखेर (खून, दरोडे, जबरी चोरी, घरफोडी, फसवणूक, सट्टा जुगार, दारुबंदी, अंमली पदार्थ, प्रतिबंधीत गुटखा, जीवनावश्यक वस्तू कायदा) एकूण ६३६ गुन्हे उघडकीस आणले असून त्याद्वारे रु.५,०५,५६,९२२/- इतक्या किंमतीचा मुद्दे माल जप्त केला आहे.
तसेच अवैध अग्नीशस्त्र संदर्भातील एकूण ०८ गुन्हे उघडकीस आले असून त्यामध्ये १२ गावठी कट्टे व २५ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.
शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान या गावी दिनांक १६.६.२०२० रोजी छापा टाकून रु.२,१४,७२,०००/- इतक्या किमतीचा सुका गांजा जप्त करण्यात आला असून आरोपीविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

### रविवार पेठे (जि.सोलापूर) येथे जय हॉस्पिटलमधील वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांवर उपचार केल्याबाबत

**(२०) ३६०६३ (१०-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील रविवार पेठ येथील जय हॉस्पिटल येथे श्री.बाळासाहेब नंदुरे यांच्याकडे वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांवर उपचार केल्याचे तसेच कृष्णमूर्ती पिंडीपोल यांनी महाराष्ट्र नर्सिंग ॲक्ट लायसन्स मधील अटी व नियमांचे उल्लंघन केल्याची फिर्याद वैद्यकीय अधिकारी यांनी दिल्याने या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी व त्यासुमारास प्रसिद्ध झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त विषयांवर जय हॉस्पिटल येथे तपासणी करण्यात आली आहे काय, तसेच याबाबत नंदुरे व पिंडी पोलिस यांच्यावर कोणत्या कलमा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पोलिस अधिकाऱ्यांनी कोणता निर्णय घेतला आहे तसेच शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) सदर चे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १५.९.२०२१ रोजी प्रसिध्द झाले आहे.
(२) सदर दोन्ही इसमांविरुध्द गु.र.नं.४७५/२०२१, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह, महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनल ॲक्ट, १९६१ चे कलम ३३, ३३(१) व ३६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) आरोपी कृष्णमुर्ती पिंडीपोल हा अमेरिकेमध्ये वास्तव्यास असून त्याच्या विरुध्द नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.
आरोपी बाळासाहेब नंदुरे यास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अंतरिम जामीन मंजूर केला आहे.
(४) विलंब झालेला नाही

---

**सोलापूर शहरातील पोलीस वसाहतीच्या मुलभूत सोयी सुविधोकरिता विशेष निधीची तरतूद करण्याबाबत**

**(२१) ३६३८३ (१०-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील पोलीस वसाहतीमध्ये मुलभूत सोयी सुविधाकरिता विशेष निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांना दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर शहरातील पोलीस मुख्यालय, केशव नगर, वसंत नगर, कविता नगर, शामा नगर, सदर बाझार पोलीस लाईन, अरविंद धाम हे पोलीसमध्ये गेल्या काही वर्षापासून मुलभूत सोयी सुविधा नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस वसाहतीच्या मुलभूत सोयी सुविधांबाबत तसेच विशेष निधीच्या तरतुदीबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४) पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचेकरिता एकूण ९ पोलीस वसाहती बांधण्यात आलेल्या आहेत. पोलीस वसाहतीमधील निवासस्थाने जुनी असून राहण्यास अयोग्य आहे. नवीन निवासस्थाने धोकादायक म्हणून घोषित झालेली नाहीत, परंतू छोटी व राहण्यास अपुरी आहे. त्यामुळे पोलीस अधिकारी / कर्मचारी राहत नाही.
पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर आस्थानपेवरील (१) पोलीस मुख्यालय जुना/नवीन ब्लॉक, (२) किल्ला पोलीस लाईन व (३) सदर बाझार पोलीस लाईन ह्या ब्रिटीश कालीन असल्याने त्या पाडून नवीन निवासस्थाने (८००) व प्रशासकीय इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.
शामानगर, किल्ला पोलीस लाईन, सदर बाझार, केशवनगर, वसंतनगर, अरविंधधाम येथील पोलीस वसाहतीमधील प्रसाधनगृहे व इमारतीचे नुतनीकरण करण्याकरिता निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, यांच्याकडून जिल्हा नियोजन अधिकारी सोलापूर यांना सादर करण्यात आला आहे.
पोलीस वसाहतीमध्ये कंपाऊंड वॉल बांधकाम, खुली व्यायामशाळा, आरओचे पिण्याचे पाण्याची सोय, सांडपाणी निचरा इ. सोयी केलेली आहे.

सोलापूर ग्रामीण जिल्हा आस्थापनेवरील कवितानगर पोलीस वसाहतीमधील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करण्याकरिता रु.८८,७६,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास दिनांक १९/०९/२०१९ अन्वये तसेच (ब्लॉक क्र.बी-१ ते बी-७(१) पैकी ३९ इमारतींची दुरुस्तींची कामे घेणेकामी रु.८०८.३७ लाख इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास दिनांक ०५/११/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून निधी उपलब्धतेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौजे उत्राण अ.ह. (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील गिरणा नदीच्या धरणाचा मायनर - ३ पाटचारी पात्रातील बेकायदा बांधकामे बंद करणेबाबत**

**(२२) ३६५७८ (०६-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलसंपदा विभागाने शासन परिपत्रक प्रमाणे क्र. पु.र.नि.-२०१८ /(१८२/२०१८) सिं.व्य.(महसूल) दि.३ मे २०१८ च्या अगोदर पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र. एफडीडबल्यू १०८९/२४३/८९ सिं.व्य. कामे दि.२/०९/१९८९ आणि २१/०९/१९८९ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पुररेषेचा आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पुररेषेची आखणी करणे व निषिध्द व नियंत्रित क्षेत्राचा उपयोग करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे उत्राण अ.ह. (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील गिरणा नदीच्या पश्चिमेकडील धरणाच्या मायनर - ३ या पटचारीपासून ते संपूर्ण अंतुर्ली बु. व उत्राण शिवार यातून वाहणारा नदी सदृश नाला पात्रात पुररेषा पातळीत सुरू असलेले बेकायदेशीर बांधकाम तातडीने बंद करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक १७/०९/२०२१ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी जळगांव यांना निवेदन दिलेली आहेत, हे खरे आहे काय..

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त शासन परिपत्रक तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या उक्त निवेदनांच्या अनुषंगाने पुररेषा पातळीत उक्त ठिकाणी नदी पात्रात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे बंद करण्याबाबत तसेच बेकायदेशीर बांधकामे करणाऱ्या संबंधितांवर शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :**(१) होय.

(२) होय.

मौजे उत्राण अ.ह.(ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील नदी/नाला पुररेषा पातळीत सुरू असलेले बेकायदेशीर बांधकाम बंद करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जळगांव यांना निवेदन दिलेले आहे.

(३) सदरचा मूळ अर्ज जिल्हाधिकारी, जळगांव यांनी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे.

(४) पुढील कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या शहरी भागात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात सार्वजनिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत**

**(२३) ३७७३० (२८-०३-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शहरी भागात असलेल्या झोपडपट्ट्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पात विकासकाने सार्वजनिक आरोग्य केंद्र बांधून देण्याचा निर्णय झोपु प्राधिकरणाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नवीन प्रकल्पात किती विकासकांनी सार्वजनिक आरोग्य केंद्रे बांधण्याचे काम पूर्ण केले आहे याबाबत शासनाने चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२(३) :** (1) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये बालवाडी व वेलफेअर सेंटर प्रमाणेच हेल्थ सेंटर (दवाखाना) आवश्यक करण्याच्या अनुषंगाने विकासक नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आला आहे. प्रस्तावावर अंतिम निर्णय झालेला नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली पश्चिम (मुंबई उपनगर) विभागातील पोलीस ठाणे इमारतीच्या झालेल्या दुरवस्थेबाबत**

**(२४) ३७८५२ (१२-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली पश्चिम (मुंबई उपनगर) विभागातील पोलीस ठाणे या इमारतीमध्ये साधारण २५० ते ३०० हून अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून येथील इमारतीची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पोलीस ठाण्यामध्ये दैनंदिन कामासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची ये-जा चालू असून भविष्यात इमारत कोसळून येथे जिवित हाणी वा अपघात घडू नये यासाठी इमारतीचे दुरुस्तीकरीता निधी उपलब्धतेबाबत गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने इमारतीची दुरुस्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०२३) :**(१),(२) व (३) होय.
बोरीवली पोलीस ठाणे इमारतीचे दुरुस्ती कामांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेले रु.१,६९,०७,७९३/- इतक्या रकमेचे अंदाजपत्राकास शासनाची प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेकरीताचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या दि.२२/१०/२०२० च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. तथापि, कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमिवर महसूलात झालेली घट, त्यामुळे राज्यासमोरील अर्थसंकटामूळे निधीची कमतरता, वित्त विभागाने घातलेले खर्चावरील निर्बंध, यामुळे निधीच्या अभावी दुरुस्ती प्रकरणांना प्रशासकीय मान्यता देता आली नाही. आता प्रशासकीय मान्यता व निधी देण्याची कार्यवाही सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिल-देवपूर (जि.धुळे) येथे चोरीचा व लुटमारीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याबाबत**

**(२५) ३७९९८ (०७-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिल-देवपूर (जि.धुळे) येथे चोरट्यांनी एकाच रात्री चार घरे फोडून लाखोंचा ऐवज चोरी केल्याचे दिनांक ०४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे शहरासह आजूबाजूच्या परिसरात चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने तसेच वारंवार घडत असलेल्या चोरी, लुटमारीच्या घटनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) देवपूर, धुळे येथे दिनांक ०२.०१.२०२२ रोजी बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रु.१,३७,०००/- इतक्या किमतीचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

त्याच दिवशी धुळे शहरातील मिल परिसरातील कुरीयर कंपनीचे कार्यालय तोडून रु.१,७२,७७२/- इतकी रोख रक्कम चोरून नेली आहे.

(२) धुळे शहर व परिसरातील चोरीच्या वाढत्या घटनांना प्रतिबंध करण्याकरीता प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीत बीट मार्शल वाढविण्यात आले आहेत.

धुळे शहर व परिसरामध्ये वेळोवेळी नाकाबंदी करण्यात येऊन संशयित वाहनांची तपासणी करण्यात येते.

चोरी व घरफोडी यासारख्या गुन्ह्यातील निष्पन्न आरोपींची माहिती घेऊन त्यांच्या विरुध्द म.पो.का. १९५१ च्या कलम ५६ प्रमाणे हद्दपारीची कारवाई करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## जळगांव जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या मौजे जवखेडा मायनर ते गालापुर खडकेसिम पाटचारी दुरुस्ती करण्याबाबत

**(२६) ३८६७६ (१२-०४-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या मौजे जवखेडा मायनर ते गालापुर खडकेसिम पाटचारी तसेच खडकेसिम ल.पा.तलाव पर्यंत भातखेडा मायनर चारीची दुरुस्तीचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने दुरुस्ती करणेबाबत परिसरातील ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विषयाबाबत दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी उपाध्यक्ष, ता.पा.वि.म. जळगांव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगांव यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगांव जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या मौजे जवखेडा मायनर ते गालापुर खडकेसिम पाटचारी दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०२३) :**(१) होय
(२) होय
(३)होय
(४) मौजे जवखेडा मायनर ते गालापुर खडकेसिम पाटचारी दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही हाती घेण्यात आली आहे व मार्च २०२३ अखेर पर्यंत सदर पाटचारीचे दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात येईल.

भातखेडा मायनरच्या दुरुस्तीची कामे रब्बी पूर्व करावयाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामे अंतर्गत उपलब्ध निधीतून पूर्ण करण्यात आली असून, मागणीनुसार प्रवाही १२५ हे. सिंचन तसेच २६० हे. क्षेत्र विहिरीवर असे एकूण ३८५ हे. क्षेत्र सिंचित झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर तालुक्यातील ( जि.ठाणे ) घाटघर-चोंढे जलविद्युत प्रकल्पात बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरीसाठी संघर्ष करावा लागत असल्याबाबत

**(२७) ३८७७४ (११-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर ( जि.ठाणे ) तालुक्यातील घाटघर-चोंढे जलविद्युत प्रकल्पात बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना आजही नोकरीसाठी वारंवार विनंती, अर्ज, निवेदने व आंदोलने करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने घाटघर प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने चोंढे बु'' यांच्या माध्यमातून प्रकल्प बंद आंदोलन केल्याचे दिनांक ०२.११.२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटघर जलविद्युत महानिर्मिती कंपनीत एकूण १४२ कर्मचारी पदे मंजूर असून ११४ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त ठिकाणी २८ पदे रिक्त असून या जागांवर सदरहू प्रकल्पात बाधित झालेल्या २८ प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याबाबत घाटघर प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने लेखी निवेदनाद्वारे प्रकल्प मुख्य अभियंता यांना दिनांक ०५.१२.२०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त हे जलसंपदा विभागाचे असून महानिर्मिती कंपनी त्यांना नोकरी देऊ शकत नसल्याचे नेहमीच उत्तर देण्यात येत असल्याने या २८ प्रकल्पग्रस्तांनी घाटघर जलविद्युत प्रकल्प कार्यालयासमोर दिनांक १७ डिसेंबर, २०२१ पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

सद्य:स्थितीत घाटघर जलविद्युत केंद्र चोंढे येथे दि. ३१.०१.२०२२ पर्यंत एकूण मंजूर ९२ पदांपैकी ३७ विविध पदे रिक्त आहेत.

(३) अशंत: खरे आहे.

प्रकल्पग्रस्तांनी त्यांचे दि. ०२.१२.२०२१ चे पत्रान्वये महवितरण / MSPGCL यांचेकडे मागणी केली आहे.

(४) अशंत: खरे आहे.

प्रकल्पग्रस्तांना शासन सेवेत थेट नेमणुका देणे शक्य नसल्याने महानिर्मिती कंपनीने प्रशिक्षण दिलेल्या ११ प्रकल्पग्रस्तांनी दि.१७/१२/२०२१ रोजी कार्यकारी अभियंता, घाटघर जलविद्युत केंद्र, चोंढे (महावितरण कंपनी ) येथे बेमुदत उपोषणास बसले होते व त्यांनी दि.२०/१२/२०२१ रोजी उपोषण मागे घेतलेले आहे.

(५) घाटघर जलविद्युत केंद्राची उभारणी ही जलसंपदा विभागाने केली असून सदर विद्युत केंद्र हे भाडेतत्वावर चालविण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडे सोपविलेले आहे. तसेच घाटघर जलविद्युत केंद्राची उभारणी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीतर्फे जमीन संपादित करण्यात आलेली नसल्याने घाटघर जलविद्युत केंद्रामुळे बाधित झालेले प्रकल्पग्रस्त हे महानिर्मिती कंपनीचे प्रकल्पग्रस्त नाहीत. तथापि, सदरील प्रकल्पग्रस्तांना इतरत्र नोकरी मिळविण्यास सक्षम करण्याच्या हेतूने महानिर्मिती कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व योजनेखालील औष्णिक विद्युत केंद्र नाशिक बी.टी.आर.आय. प्रशिक्षण केंद्रात आय.टी.आय. चे मुलभूत प्रशिक्षण सन २०१० ते २०१३ मध्ये देण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे कंत्राटदार व एक्सपोर्ट कंपन्याकडून अनधिकृत ठेकेदारांमार्फत गोमांस व मांस यांची विक्री होत असल्याबाबत**

**(२८) ३८९११ (०७-०४-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे कंत्राटदार व एक्सपोर्ट कंपन्याकडून अनधिकृत ठेकेदारांमार्फत गोमांस, मांस विक्री होत असल्याबाबत शासनाच्या निदर्शनास आणूनही कोणतीही कारवाई न झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कंत्राटदार व एक्सपोर्ट कंपनीविरुध्द कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२(३) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष भरु काढणे तसेच इतर मागण्याबाबत**

**(२९) ३८९६७ (११-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांकरिता दिनांक ०२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा व इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे गेट बंद करण्याचा इशारा हिंगोली जिल्हासिंचन संघर्ष समितीने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जिल्हयात अनेक सिंचन योजना प्रस्तावित असून त्यावर अंमलबजावणी होत नसल्याने हिंगोली जवळील मौ.खरबी या गावाजवळ कयाधु नदीवर बॅरेज बांधून येथून इसापूर धरणात पाणी वळविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रस्तावित बॅरेजला मान्यता देण्याबाबत व इतर मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हिंगोली जिल्हयातील सिंचन अनुशेष निर्मूलन करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत (७ )साठवण तलाव व (३) उच्च पातळी बंधाऱ्यांची कामे सुरु आहेत. याद्वारे एकूण ९६९२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.त्यापैकी एका साठवण तलावाचे (नवल गव्हाण) काम पूर्ण झाले असून, त्याद्वारे ४९० हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच ०४ साठवण तलावांची कामे (हळदवाडी, अंभेरी, बोराळा व पिंपळखुंटा) प्रगत आहेत. सुकळी व डिग्रस या दोन साठवण तलावांचे सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण करण्यात आले आहे.

मौ. खरबी या गावाजवळ कयाधु नदीवर उच्च पातळी बंधारा बांधून येथून इसापूर धरणात पाणी वळविण्यासाठी (प्रवाही पध्दतीने) प्रस्तावित केलेल्या कामांना तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचोरा ( जि. जळगांव ) रा.गिरणा पंम्पीग रोड,येथे वारसा हक्काने विद्युत वितरण कंपनीत नोकरी मिळण्याकरिता केलेला अर्ज

**(३०) ३९३७७ (३१-०३-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा ( जि. जळगांव ) रा.गिरणा पंम्पीग रोड, येथील श्री. हरिष प्रेमा आदिवाल , यांनी लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काच्या अंमलबजावणीच्या शासनाच्या परिपत्रकाच्या अनुसार त्यांच्या मुलाला वारसा हक्कानुसार महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, जळगांव परिमंडळ येथे नोकरी मिळण्याकरीता अर्ज केला असता शासकीय आदेश वा परिपत्रक आणि प्रशासकीय कारणे वा सबबी यात विसंगती असल्याचे कारण देत शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वारसा हक्कानुसार नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे, खरे नाही.

(२) लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगाराच्या सेवानिवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छानिवृत्तीनंतर किंवा वैद्यकियदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या वारसास वारसा हक्काने नोकरी देण्याची तरतूद आहे. तथापि, अर्जदाराने राजीनामा दिलेला आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या मुदतीत सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबाकडून नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याकडे वारसा हक्काने नियुक्ती करण्याकरीता अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अर्जदाराने १० वर्षानंतर वारसास नोकरी मिळण्यासाठी महावितरण कंपनीकडे अर्ज केला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे श्री. हरिष प्रेमा अदिवाल यांनी रिट याचिका क्र. ६६८०/२०२२ दाखल केली होती. सदर रिट याचिकेवर मा. न्यायालयाने दि.०१.०७.२०२२ रोजी खालील निर्देश दिले आहेत:-

"In view of the above, this petition is disposed off with the expectation that respondent No. ७ would consider the case of Sandip Adiwal based on his seniority in the list of enlisted candidates for appointment on vashila padhat as a sweeper and in the light of available vacancies"

मा. न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त न्यायानिर्णयाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी सद्य:स्थितीत शासनस्तरावर तपासणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर्णा पाटबंधारे (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील विभागांतर्गत सुरू असलेल्या सिंचन प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत

**(३१) ३९४७५ (३१-०३-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा पाटबंधारे (ता.गंगाखेड, जि.परभणी) विभागाअंतर्गत सुरू असलेल्या सिंचन प्रकल्पाच्या कालवा स्वच्छता कामे करण्याकरीता पाखरण कार्यक्रम मंजूर असताना त्याअंतर्गत सिंचनाकरीता कालव्याद्वारे पाणीपुरवठा वेळेवर होत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन माहिती मागविली असता त्यांनी विभागाच्या अनेक अडचणी लेखी स्वरूपात दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सिंचन प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामधील अडचणी सोडवून सिंचन करीता मुबलक पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.जलसंधारण मंत्री, मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) हे अंशत: खरे आहे.

मंजूर पाखरण कार्यक्रमानुसार यांत्रिकी विभागाकडून उपलब्ध यंत्रसामुग्रीद्वारे आवश्यक कामे पूर्ण करुन व प्रकल्पांतर्गत एकूण चार शाखा कालव्यांपैकी एकावेळी दोन शाखा कालव्यांना आळीपाळीने पाणी उपलब्ध करुन सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(२) होय हे खरे आहे.

मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी दि.२०.११.२०२० अन्वये दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग,वसमतनगर,जि.हिंगोली यांनी दि.२३.११.२०२० अन्वये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

(३) होय हे खरे आहे.

दि.२०.११.२०२० रोजीचे निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे.

(४) यांत्रिकी विभागामार्फत आवश्यकतेप्रमाणे सन २०१९-२० मध्ये ६२.०० कि.मी. व सन २०२०-२१ मध्ये ७३.०० कि.मी. लांबीची कामे पाखरण कार्यक्रमांतर्गत करण्यात आली आहेत.

अशासकीय सेवाभावी संस्था मार्फत लघु वितरिकेवरील कामासाठी कालवा स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. त्यानुसार सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये अशासकीय संस्थेमार्फत अनुक्रमे १५५ कि.मी. व १६२ कि.मी. लांबीमध्ये कालवा स्वच्छतेचे काम करण्यात येऊन उपलब्ध क्षमतेप्रमाणे पुच्छ भागात पाणी देण्यात आले आहे.

तसेच कालव्याची वहनक्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत कालवा दुरुस्तीची कामे प्रस्तावित करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुधनी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथे सुरु असलेल्या अवैध गैरकारभार असल्याबाबत**

**(३२) ३९५१८ (१२-०४-२०२२). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधनी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथे गेल्या कित्येक वर्षापासून अवैध गैरकारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीस अधीक्षक, सोलापूर यांच्या पथकाने वारंवार या अवैध गैरकारभारांवर कारवाई करुनही दुसऱ्याच दिवशीच सदरहू अवैध गैरकारभार पुन्हा सुरु करुन सदर पथक कार्यवाही करताना स्थानिक पोलीस त्यांना सहकार्य व मदत करत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध गैरकारभारांना पाठीशी घालण्याचे काम स्थानिक पोलीस करीत असल्याने दोषी अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) दूधनी, तालुका अक्कलकोट येथे जुगार या अवैध धद्यासंदर्भात माहे जानेवारी २०२१ ते जून २०२२ या कालावधीत एकूण १३ केसेस दाखल असून १०९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु.१७,९६,७८६/- इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

सदर कालावधीतच मटका या अवैध धंद्यासंदर्भात एकूण १३ केसेस दाखल असून सदर गुन्ह्यांमध्ये एकूण रु. ९,५२४/- इतकी रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

तसेच दारुबंदी प्रकरणांत एकूण ३९ केसेस दाखल असून सदर गुन्ह्यांमध्ये एकूण रु. १,१९,९६४/- इतक्या रकमेचा मुद्देमाल व रोख रक्कम जप्त करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

ज्यावेळी अवैध गैरकारभाराविषयी गोपनीय माहिती मिळते त्यावेळी दूधनी येथील स्थानिक पोलीस/ स्थानिक गुन्हे शाखेमार्फत कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

---

## पिंपळनेर-निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) ३९५३२ (०७-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर-निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील पोलीस कर्मचा-यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याने जुनी निवासस्थाने जमीनदोस्त करुन सर्व सुविधा असलेल्या इमारती बांधून निवास व्यवस्था करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :**(१) व (२) होय.

अ) पोलीस ठाणे, निजामपूर:-

राज्यातील एकुण ५६९२३ पोलीस सेवा निवासस्थानाच्या बांधकामासाठी तयार केलेल्या यादीस शासनाची मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, त्यानंतर प्राथम्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

ब) पोलीस ठाणे पिंपळनेर:-

पोलीस ठाणे, पिंपळनेर येथील पोलीस अंमलदार यांची एकूण २६ शासकीय निवासस्थाने असुन त्यापैकी ११ निवासस्थानामध्ये अंमलदार राहत असून १५ निवासस्थाने राहणेयोग्य नाहीत. दुय्यम पोलीस अधिकारी यांचेकरिता निवासस्थाने उपलब्ध नसून, प्रभारी अधिकारी यांचेकरिता असलेल्या शासकीय निवासस्थानात प्रभारी अधिकारी सद्यस्थितीत राहत आहे. सदर निवासस्थानांचे दुरुस्ती करिता अद्यापपावेतो प्रस्ताव प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरी रोखण्यासाठी बायोमॅट्रीक सर्वेक्षण करण्याकरिता होत असलेल्या विलंबाबाबत.

**(३४) ३९६४८ (१९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी)** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या ५८ संक्रमण शिबिरात अद्यापपर्यंत होत असलेली घुसखोरी रोखण्यासाठी येथील रहिवाशी कुटुंबांची बायोमॅट्रीक सर्वेक्षण करण्याचा राज्य शासनाने दिनांक १९ ऑक्टोंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेऊन त्या शासन तथा म्हाडाने त्याची अमंलबजावणी सुरु केली असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संक्रमण शिबिरात करण्यात आलेल्या बायोमॅट्रीक सर्वेक्षणांतर्गत एकूण ५८ संक्रमण शिबिरांपैकी किती संक्रमण शिबिरातील रहिवाशी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०२२ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहेत व किती बाकी आहे, तसेच सदरहू उर्वरित काम किती निश्चित कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदरहू संक्रमण शिबिरात किती अधिकृत व अनाधिकृत रहिवाशी कुटुंबे रहात असल्याचे आढळून आले आहे, त्यानुसार शासन तथा म्हाडाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०२२) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३)
१) संक्रमण शिबीरातील अनधिकृत रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष विचार करून शासनाने दि. १३.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये काही अटी व शर्तींच्या अधीन राहून अनधिकृत भाडेकरू / रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरामध्ये गाळे वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून खालीलप्रमाणे "अ", "ब" व "क" असे तीन प्रवर्ग करण्यात आले आहेत.
अ) मुळ रहिवाशी यांना संक्रमण शिबीरामध्ये स्थानांतरण करण्यात आलेले आहे.,
ब) अशा प्रकारचे रहिवाशी ज्यानी मुखत्यारपत्र (Power of attorney) किंवा तत्सम प्राधिकार पत्राद्वारे मुळ रहिवाश्यांकडून संक्रमण शिबीरातील गाळ्यांचा हक्क घेतला आहे,
क) अशा प्रकारचे घूसखोर रहिवाशी ज्यांनी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळयांचा अनधिकृतपणे ताबा घेतला आहे.
२) सदर शासन निर्णयानुसार संक्रमण शिबिरातील रहिवाशांचे वर्गवारी निश्चित करण्यासाठी बायोमॅट्रीक सर्वेक्षण करण्यासाठी संगणक प्रणाली (Software) विकसित करण्यात आली आहे. सर्व संक्रमण शिबीर गाळयांचे प्रत्यक्ष घरोघरी जावून बायोमॅट्रीक सर्वेक्षणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.
या करिता अंदाजे २० बायोमॅट्रीक सर्वेसाठी लागणारे यंत्र व त्याची हाताळणी करण्यासाठी लागणारे बाहय स्त्रोतामार्फत एजेंन्सी नेमून २० मनुष्यबळ लागणार असून त्यासाठी बायोमॅट्रीक सर्वेसाठी लागणाऱ्या यंत्र व त्याची हाताळणी करण्यासाठी लागणारे बाहय स्त्रोतामार्फत एजेंन्सी नेमण्यात आली असून, बायोमॅट्रीक सर्वेक्षण करणे करिता भाडेकरु/रहिवाशी यांचे आधारकार्ड प्रमाणीकरण करण्याची सुविधा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि.१३.०९.२०१९ च्या विरुध्द मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.०१/२०२० श्री. यावर हुसेन गुलाम उमाटिया व इतर यांनी दाखल केली आहे. सदर यांचिकेवर मा. उच्च न्यायालय यांनी दि.२०.१०.२०२० रोजीच्या आदेशान्वये "पुढील न्यायालयीन आदेश प्राप्त होईपर्यत सदर शासन निर्णयानुसार पुनर्वसनाची कारवाई करु नये" असे आदेशित केले आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुर्णा पाटबंधारे (ता.बसमत, जि.हिंगोली) विभागाअंतर्गत कालव्याच्या विशेष दुरुस्तीसाठी लागणाऱ्या कामांच्या मंजूरीबाबत

**(३५) ३९९४२ (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील पुर्णा प्रकल्पाचे कार्यान्वयन १९६० मध्ये करण्यात येवून या प्रकल्पांतर्गत हिंगोली जिल्हयात येलदरी व सिध्देश्वर ही दोन धरणे बांधण्यात आली असून सदर दोन्ही धरणापासून पुर्णा प्रकल्पाची वितरण व्यवस्था निर्माण झालेली असून त्यावर ४ शाखा (कालवे) देखील बांधण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, येलदरी धरणाला एक मुख्य दगडी भिंतीसह चार मातीच्या भिंती असल्याने या माती भिंती तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत मात्र सद्यस्थितीत या माती भिंतीकडे दुर्लक्ष झाल्याने भिंतीवर मोठमोठे झाडेझुडपे वाढली असून माती

भिंतीला सुरक्षेसाठी लावलेली दगडी भिंतही विस्कळीत झाल्याने माती भिंतीला धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाच्या कालव्यावर वितरण व्यवस्था सुरळीत चालून पाण्याचे नियोजन करण्यासाठी त्याची विशेष दुरुस्तीसाठी सुमारे १८ कोटी ५७ लाख ४८ हजार ६९९ रुपये इतका निधी उपलब्ध व्हावा असा प्रस्ताव शासनाकडे कार्यकारी अभियंता यांचेकडून मागील वर्षी पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याच संदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, हिंगोली जिल्हा यांनी देखील सदर धरणाच्या कालव्यांवरील वितरण व्यवस्थेच्या विशेष दुरुस्तीसाठी मागणी करण्यात आलेला रुपये १८ कोटी ६० लाख इतका निधी शासनाने तातडीने उपलब्ध करुन दयावा अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यानी त्यांचे दि. १३ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री तसेच मा.प्रधान सचिव,जलसंपदा विभाग यांचेकडे केली असल्याचेही दिनांक २५ जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माती धरणावरील झाडेझुडपे नियमितपणे साफ करण्यात येतात. माती व दगडी धरणाला कोणताही धोका नाही.

(३) हे खरे नाही.

(४)होय,हे खरे आहे.

(५) पूर्णा प्रकल्पावरील मुख्य कालवा व शाखा कालव्याचे क्षतिग्रस्त मोठे बांधकाम दुरुस्ती,सायफन दुरुस्ती,पुलाचे पुनर्बांधकाम

व इतर अत्यावश्यक कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्यासाठी बाह्य यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करण्याचे कामाचे रु.९७.०७ लक्ष रुपयाचे अंदाजपत्रकास दि.०६.०८.२०२१ अन्वये प्रादेशिक कार्यालयाने प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदर कामाची निविदा प्रक्रिया कार्यवाही पूर्ण झाली आहे. सर्व्हेक्षणाचे काम झाल्यानंतर विशेष दुरुस्ती अंतर्गत सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर नियोजित आहे.

(६) कार्यवाही प्रगतीत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रात महानगरपालिका असतानाही पोलीसांच्या वसाहती नादुरुस्त असल्याबाबत

**(३६) ४०१४२ (०७-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील बृहनमुंबई, ठाणे, नवी मुंबई, भाईंदर, वसई-विरार, पनवेल कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर व भिवंडी यासारख्या महानगरपालिका असतानाही त्यांच्या सुरक्षितेसाठी अविरत कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय राहत असलेल्या वसाहती अत्यंत जुन्या, जीर्ण व मोडकळीस आल्याने ते असुरक्षित जीवन जगत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींची गळती देखभाल, दुरुस्ती व दुर्गंध मुक्त करण्याची गरज असतानाही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असून पोलीस वसाहतीतील अनेक छत्र कोसळून व इतर अपघात झाल्यास जबाबदारी कोणत्या यंत्रणेवर राहील हे शासन निश्चित करणार आहे काय तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा भाडे व दुरुस्तीसाठीची रक्कम कपात करण्यात येत असतानाही वेळेत देखभाल व दुरुस्ती देखील करत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी राज्यातील जनतेची सुरक्षा अबाधित राहण्यासाठी पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी राहत असलेल्या वसाहतींची दुरुस्ती देखभाल आणि सुरक्षा करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१), (२) व (३) पोलीस विभागाच्या ताब्यातील शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती-देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते. नादुरुस्त निवासस्थानांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाकडून दुरुस्तीच्या खर्चाचे अंदाजपत्रक सक्षम प्राधिकाऱ्यांच्या तांत्रिक मान्यतेसह संबंधित घटकाकडून मागविण्यात येतात. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता सक्षम प्राधिकाऱ्यांकडून दिला जाते. व निधी उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कार्यवाही केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३७) ४०४७० (०७-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील ८ महसूल विभागांतर्गत पोलीस पाटलांच्या १९७० मंजूर पदांपैकी ८८० पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्यामुळे गावातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अलिबाग-१२४, पेण-७२, कर्जत-१४१, माणगाव-१३८, रोहा-९८, महाड-१२१, श्रीवर्धन-९६, पनवेल-९० या सर्व पोलीस पाटलांची रिक्त असलेल्या पदांमुळे महात्मा गांधी तंटा मुक्त अभियान राबविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापकरणी शासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावातील कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी तसेच पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणत्या उपाययोजना व कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :**(१) हे खरे नाही.
पोलीस पाटील पद रिक्त असलेल्या गावांचा अतिरिक्त कार्यभार शेजारच्या गावातील पोलीस पाटलांकडे देण्यात आलेला असल्याने पोलीस पाटलांच्या रिक्त पदांमुळे गावातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४)
पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू असून पोलीस पाटील संवर्ग सुधारित बिंदूनामावली तपासून अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर असून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब (जि.यवतमाळ) येथील पोलीस अधिकारी यांची घरे मोडकळीस आल्याबाबत**

**(३८) ४०६६९ (०७-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.यवतमाळ) येथील पोलीस अधिकारी यांच्या घरांचे बांधकाम जुन्या पद्धतीचे असल्याने नादुरुस्त व मोडकळीस आल्याने अधिकारी यांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांच्या घराची दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे राहण्यास योग्य नसल्याने परिसरामध्ये अस्वच्छता पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार नवीन घरे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१) होय.

पोलीस ठाणे, कळंब येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता १ पोलीस अधिकारी व १७ अंमलदार असे एकूण १८ शासकीय निवासस्थान उपलब्ध आहेत. सदर निवासस्थानांचे बांधकाम साधारणात: १९३५-३६ दरम्यानचे असून सदरची शासकीय निवासस्थान मोडकळीस आलेले / जीर्ण झालेली आहेत व राहण्यास अयोग्य आहेत. त्यामुळे त्यापैकी एकही शासकीय निवासस्थानाचे वितरण करण्यात आलेले नाही. सद्यस्थितीत सदर शासकीय निवासस्थानामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार हे प्रत्यक्ष वास्तव्यास नाहीत.

(२) नाही.

सदरची शासकीय निवासस्थाने हे मोडकळीस आलेली असून ती राहण्यास अयोग्य आहेत. परंतू परिसरामध्ये वेळोवेळी स्वच्छता ठेवण्यात येत आहे.

(३) पोलीस ठाणे, कळंब यांनी त्यांचे दि.२८.०३.२०२२ चे पत्रान्वये पोलीस ठाणे, कळंब येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता शासकीय निवासस्थाने व प्रशासकीय इमारत बांधकाम प्रस्ताव सादर करताना जमीन पोलीस विभागाच्या नावावर असणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे कळंब येथील शासकीय गट क्र.७८२ क्षेत्र ८.२२ हे आर पैकी ०.९५ हे. आर जमीन पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निवासस्थान बांधणेकामी मिळणेबाबतचा अहवाल तहसिलदार, कळंब यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या अवैध गैरकारभाराबाबत**

**(३९) ४०७३५ (१२-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात डान्सबार, पब-परमिट रुम, हुक्का पार्लर व अवैध गैरकारभार, टी.व्ही. वाहिनीवर व अन्य मार्गाने निदर्शनास येत असताना पोलीस विशेष शाखेकडून वस्तुस्थिती न तपासता अशा प्रकारच्या घटना घडल्या नसल्याचे पोलिसांनी लेखी स्वरुपात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच याबाबतची माहिती तेथील लोकप्रतिनिधीनीच द्यावी अश्या प्रकारचे लेखी पत्र पोलीस विशेष शाखा ठाणे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधीना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी सुरु असलेल्या अवैध गैरकारभारांची माहिती घेण्यास गुप्तचर यंत्रणा गुन्हे अन्वेषण व विशेष शाखा अयशस्वी ठरत असल्याने या बेजबाबदार व दिशाभूल करणारी माहिती याबाबतची चौकशी करण्याची मागणी

देखील दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित केलेल्या दिनांक ११.०१.२०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तपासून बंद लिफाफ्यात स्थानिक लोकप्रतिनिधींना पोलीस आयुक्तालय, ठाणे यांचेमार्फत उत्तर देण्यात आले आहे.

(३) ठाणे महापालिका क्षेत्रात वाढणारे अवैध धंदे व कोरोनाचे नियम तोडून चालणारे डान्सबार, हुक्का पार्लर, परमिट रूम याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ११.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निवेदन सादर केलेले आहे.

(४) ठाणे पोलीस आयुक्तालयाकडून नागरिक व लोकप्रतिनिधी त्याचप्रमाणे वेगवेगळ्या समाज माध्यमातून प्राप्त होणारी प्रत्येक माहितीची तंतोतंत पडताळणी करण्यात येते व माहिती सत्य असेल तर कायदेशिर कारवाई करून अवैध व्यवसायांवर प्रतिबंध करण्यात येतो.

यानुषंगाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते ३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीत अवैध व्यवसायांवर केलेल्या कारवाईचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अवैध धंद्याचा प्रकार | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | **गुटखा/कोटपा** | ४१ | ६४ | रू. १,४९,६६,४३१ |
| २ | एनडीपीएस (सेवन करणे, बाळगणे, विक्री करणे) | ३१६ | ४८१ | रू. १,९२,९७,१४६ |
| ३ | बनावट दारू | ८० | ८८ | रू. ४,५६,१०४ |
| ४ | जुगार | १५३ | ७१६ | रू. २१,४२,६३० |
| ५ | पिटा ॲक्ट | २८ | ४३ | रू. १,०१,०६० |
| ६ | बार कारवाई | १९ | १३२ | ० |
| ७ | हुक्का पार्लर | १४ | १५५ | रू. ३५,२६० |
| ८ | अवैध ऑनलाईन लॉटरी | ७ | १४ | रू. १,१६,७३० |

तसेच, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते ३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीत अवैध व्यवसायाशी निगडीत आरोपींवर केलेल्या प्रतिबंधक कारवाईचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | म.पो.का. कलम ५६ | म.पो.का. कलम ५७ | मुंबई दारूबंदी अधि. कलम ९३ | सीआरपीसी कलम १०७ | सीआरपीसी कलम ११० |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६ | ३ | २० | ३९ | ५१ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-पुणे महामार्गावर शिलाटणे गावाजवळ पाच जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४०) ४०७९२ (१२-०४-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर शिलाटणे गावाजवळ भरधाव मोटारीने समोरुन येणाऱ्या ट्रकवर आदळून भीषण अपघात होऊन पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) दि.३० जानेवारी, २०२२ रोजी शिलाटणे, ता.मावळ, जि.पुणे गावचे हद्दीत जुना पुणे ते मुंबई हायवेवर इको स्पोर्ट गाडीचे चालकाने मुंबईहून पुण्याकडे जाताना अविचाराने, हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहन चालविल्यामुळे सदरचे वाहन पुण्याहून मुंबईकडे चाललेला कंटेनर ट्रक यास धडकून अपघात झाला आहे.

या अपघातात चालकासह इतर ४ सहप्रवासी यांचा मृत्यू झाल्याने लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे येथे चालक यांच्या विरुध्द गु.र.नं.१२/२०२२ भा.द.वि. कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेस्तरावर मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री तालुक्यातील पांझरा मध्यम प्रकल्प (काटीपाडा) धरणाच्या उजव्या वाढीव कालव्यावरील वितरीकेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४१) ४१००८ (११-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील पांझरा मध्यम प्रकल्प (काटीपाडा) धरणाच्या उजव्या वाढीव कालव्यावरील वितरीका क्र. १८ ते २४ चे काम गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित असलेले काम पूर्ण करण्यात यावे याकरीता जल आक्रोश कृती समितीच्या वतीने मोर्चा काढून दिनांक ०५.१२.२०२१ रोजी संबंधित जलसंपदा अधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार निवदेनाच्या अनुषंगाने उक्त वितरिकेचे प्रलंबित असलेले काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१२-२०२२) :**(१) होय.

(२) होय.

(३) पांझरा मध्यम प्रकल्प,ता.साक्री,जि.धुळे (लाटीपाडा) वाढीव उजवा कालवा कि.मी.२१.८० ते कि.मी.२८.४० मधील वितरीका क्र.१८,२० व २१ चे अनुक्रमे रु.३८६.९२ लक्ष, रु.२८८.९७ लक्ष व रु.३१६.६० लक्ष रक्कमेची विस्तार

व सुधारणा योजनेअंतर्गत विशेष दुरुस्तीची अंदाजपत्रके दिनांक १७.०५.२०२२ रोजी प्राप्त झाली असून, तांत्रिक छाननी अंती सन २०२२-२३ मधील मंजूर निधी व निर्माण झालेले दायित्व यांचा विचार करता , या आर्थिक वर्षात तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडील विशेष दुरुस्ती/ विस्तार व सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता देणे शक्य नसल्याचे शासन पत्र दि.२२.०९.२०२२ अन्वये तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर व लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस पाटील यांची भरती,**
**रिक्त पदे व मानधनात वाढ करण्याबाबत**

**(४२) ४१८३६ (०७-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर व लांजा (जि.रत्नागिरी) येथे पोलीस पाटील यांची ३६० मंजूर पदांपैकी १८४ पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच पोलीस पाटील पद भरती करुन त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भातील पद भरती, रिक्त पदे व मानधनात वाढ होण्याचे अपेक्षित आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :** (१)होय, हे खरे आहे.
(२) व (३)
पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी मार्फत कार्यवाही सुरू असून पोलीस पाटील संवर्ग सुधारित बिंदूनामावली तपासून अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर असून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
तसेच पोलीस पाटील यांच्या मानधनात शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये वाढ करण्यात येऊन मानधन रु.६५००/- करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २२ उपसा जलसिंचनांच्या दुरुस्तीबाबत.**

**(४३) ४२०३८ (०१-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील तापी नदीवरील किती उपसा जलसिंचन योजना अपूर्ण अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नादुरुस्त प्रकल्पांना दुरुस्तीसाठी किती अंदाजित खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास किती हेक्टर जमिन ओलिताखाली येईल तसेच सर्व प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारणत: किती अवधी लागणारा आहे,
(४) असल्यास, सदरील योजना पूर्ण करणेसाठी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर योजनेच्या दुरुस्तीच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) होय,
तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम १९९७ मधील १८ (म) अन्वये धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्हयातील

२५० हेक्टरपेक्षा जास्त लाभक्षेत्र असलेल्या सहकारी उपसा सिंचन योजना त्यांच्या मत्ता व दायित्वे यासह चालविण्यासाठी व देखभालीसाठी ताब्यात घेणे आणि महामंडळाच्या खर्चाची रक्कम मिळाल्यानंतर सहकारी उपसा सिंचन संस्थाकडे परत करण्याची तरतूद आहे.

धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्हयातील ६४ उपसा सिंचन योजनांसाठी तापी नदी उद्भव होता. त्यामध्ये धुळे जिल्हयातील २४ व नंदुरबार जिल्हयातील १९ उपसा सिंचन योजना अपुर्ण / बंद स्थितीत आहेत. त्यापैकी धुळे ८ व नंदुरबार १४ जिल्हयातील तापी नदीवरील बंद पडलेल्या २२ सहकारी उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरूस्तीच्या कामांना शासन निर्णय दि.०६.०६.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता व दि.२१.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनांची विशेष दुरूस्तीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) विशेष दुरूस्तीच्या २२ उपसा सिंचन योजना कामांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास शासन निर्णय उसियो-२०१९/(३६७/२०१९)सिंव्य(म), दि.२१.०१.२०२२ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यानुसार दुरूस्तीसाठी रू.११५.०३ कोटी खर्च अपेक्षीत आहे. उर्वरीत २१ योजनांचे दुरूस्ती खर्च परिगणीत केलेला नाही.

(३) सदर प्रकल्प पुर्ण झाल्यास १४४१३ हे. जमिन ओलिताखाली येईल. साधारणत: ३ वर्ष कालावधी दुरूस्तीसाठी लागणार आहे. उर्वरीत २१ योजनांचे लाभक्षेत्र पुनर्स्थापित करण्यास अद्याप सुरूवात केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, गोरेगाव येथील आदिवासी आरे वसाहतीतील गावठाण जमिनींवर**
**झोपू सर्वेक्षणाला सुरुवात केल्याबाबत**

**(४४) ४२०६९ (१२-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील आदिवासी आरे वसाहतीतील मूळ निवासी असून शासनाने तेथील गावठाण जमिनींवर झोपू सर्वेक्षणाला सुरुवात केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरेतील केल्टीपाडा, दामूपाडा आणि चाफाचा पाडा येथील जागा फोर्स वनला देण्याच्या उद्देशाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सुरु केलेल्या सदर पाड्यांच्या सर्वेक्षणास तेथील स्थानिक आदिवासींनी तसेच काही सामाजिक सस्थांनी विरोध केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२(२) :**(१), (२) व (३) होय.

आरे पोलीस ठाण्याच्या हद्दीत फोर्स वन साठी दिलेल्या जागेतील केल्टीपाडा नं.०१, केल्टपाडा नं.२ व चाफ्याचा पाडा या ठिकाणी राहणारे लोकांची आदिवासी व बिगर आदिवासी अशी वर्गवारी ठरविण्यासाठी दिनांक ०१/०२/२०२२ ते दिनांक ०४/०२/२०२२ रोजी पर्यंत सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षणाकरिता सक्षम प्राधिकार-६, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अधिकारी सदर ठिकाणी सर्वेक्षण करण्यासाठी आले होते. त्या दरम्यान श्रमिक आदिवासी संघटना व केल्टीपाडा आदिवासी गावठाण यांचे वतीने सदर सर्वेक्षणाकरिता आलेल्यांच्या विरोधात निदर्शने केली होती. सदर ठिकाणी सर्वेक्षण करिता उक्त कालावधीसाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### होटगी (जि.सोलापूर) येथे बनावट मृत्युपत्र तयार करुन जागा हडपण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(४५) ४२१०३ (१२-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होटगी (जि.सोलापूर) येथे रोड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालयासमोर राहणाऱ्या एका महिलेच्या सासऱ्यांच्या नावे बनावट मृत्यूपत्र तयार करुन जमीन हडपण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अकरा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दैनिक वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर गुन्हेगाराची चौकशी करण्यात आली आहे, तसेच संबंधित गुन्हेगारांवर कोणता गुन्हा नोंद करण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत संबंधितांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) होय हे खरे आहे,

दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दि.२७.१२.२०२१ रोजी सदर बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) व (३)

सदर प्रकरणात आरोपींनी संगनमताने मयत श्री. नरेंद्र दहिहंडे यांचे बनावट मृत्युपत्र तयार केले असून त्यांचे राहते घर, जागा, जंगम व स्थावर मालमत्तेवर कायदेशीर वारसदारांना प्रवेश करण्यास दमदाटी करुन मनाई करत असलेबाबत दाखल फिर्यादीवरुन विजापूर नाका, सोलापूर, येथे गु.र.नं. ६६४/२०२१ भा.द.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०,३८० व ५०४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### मुक्ताईनगर तालुक्यात (जि.जळगांव) मुक्ताईनगर पोलिस निरिक्षक यांच्या कारर्किदीत गुन्हेगारीत वाढ झाल्याबाबत

**(४६) ४२२७२ (१३-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर तालुका (जि.जळगांव) आदिशक्ती श्री संत मुक्ताईच्या पदस्पर्शाने पुनित झालेली भूमी असून मध्यप्रदेशाच्या सीमारेषेवर असल्याने परप्रांतियांनी अवैध गैरकारभार सुरु झाल्याने गुन्हेगारी वाढत असून मुक्ताईनगर पोलिस स्टेशनेच पोलिस निरिक्षक यांच्या कारर्किदीत वाढ झाल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) व (२) सदर प्रकरणी उप विभागीय पोलीस अधिकारी, मुक्ताईनगर यांनी चौकशी केली असून चौकशीत संबंधित पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या कर्तव्यात कसुर केल्याचे आढळून आलेले नाही.

संबंधित पोलीस निरीक्षक यांनी मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचा कार्यभार स्वीकारल्यापासून १३३ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये जुगाराच्या २१ केसेसमध्ये ३७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु.४१,७७,९१०/- इतकी रोख रक्कम व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दारुबंदीच्या ४९ केसेस मध्ये ४९ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रु.७,८८,७१४/- इतक्या रकमेची अवैध दारु व दारुची साधने जप्त करुन नष्ट करण्यात आली आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर येथील हिंगणा, जबलपूर आणि वर्धा मार्गावरील अपघातांना आळा घालण्याबाबत**

**(४७) ४२२७५ (१८-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हिंगणा, जबलपूर आणि वर्धा मार्गावरील अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून गत वर्षी (सन २०२१ मध्ये) तब्बल २६८ हून अधिक अपघाती मृत्यू झाले असून गंभीर जखमींची संख्याही लक्षणीय असल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, नागपूर येथील हिंगणा, जबलपूर आणि वर्धा मार्गावरील दिवसेंदिवस वाढ होत असलेल्या अपघातांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत;

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२(२) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२१ मध्ये नागपूर शहर हद्दीत २०६ अपघाती मृत्यू झाले असून १९९ जण गंभीर जखमी झाले आहेत.

(२) नागपूर येथील हिंगणा, जबलपूर आणि वर्धा मार्गावरील अपघातांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- अनधिकृत पार्किंग, रॉंग साईड, वाहन चालविताना मोबाईलवर संभाषण करणे, ट्रिपलसिट, हेल्मेट परिधान न करणे इत्यादीबाबत विशेष मोहिम राबविण्यात आल्या आहेत.
- वाहन चालकांना, शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना वाहन चालविताना होणाऱ्या मानवी चुकांबाबतची माहिती देवून जनजागृती करण्यात येते.
- अपघातस्थळी भेट देवून अपघाताचे ठिकाणनिहाय, वेळनिहाय, दिवसनिहाय विश्लेषण करून अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यात येतो व संबंधित विभागास कळवून आवश्यक उपाययोजना करण्यात येतात.
- वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांविरुध्द सन २०२१ मध्ये मोटार वाहन कायद्यान्वये ७१,०५८ केसेस करून दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
- वाहनांचा वेग नियंत्रण करण्यासाठी रोडवर रम्बलर स्ट्रीप्स, ब्लिंकर लाईट, सूचना दर्शक बोर्ड लावण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर-मंगळवेढा या दोन्ही तालुक्यात अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(४८) ४५७४० (२५-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर) या दोन्ही तालुक्यात अवैधरित्या मटका, जुगार, वाळू तस्करीचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरु असून तरुण पिढी व्यवसनाधीन होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून वारंवार करुनही पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नवीपेठ, जुनीपेठ, बसस्थानक परिसरात देखील अवैध व्यवसाय खुलेआम सुरु असल्याने याचा त्रास सर्वसामान्य नागरिक व महिलांना सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदरहू अवैध व्यवसाय बंद करण्याच्या दृष्टीने तसेच संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

पंढरपूर व मंगळवेढा या दोन्ही तालुक्यात मटका, जुगार व वाळू तस्करी या अवैध धंद्यावर एप्रिल २०२२ अखेर एकुण १५५ प्रकरणी कारवाई करुन त्यात २४९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पंढरपुर पोलीस ठाणे यांचेकडून जुनी पेठ, नवीन पेठ व बस स्थानक येथे अवैध प्रकार दिसून आल्यास तात्काळ कार्यवाही केली जाते. माहे एप्रिल २०२२ अखेर या भागात दारुबंदी व जुगाराच्या एकुण १६ प्रकरणात १६ अरोपींना अटक करण्यात आली आहे.

या भागातील महिलांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने पोलीस घटकांकडून निर्भया पथकामार्फत पेट्रोलींग करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) विलंब झालेला नाही.

---

## मौजे भूगाव, भुकूम, पिरंगुट, लवळे, चांदे व नांदे (ता.मुळशी, जि.पुणे) येथे पोलीस आयुक्त कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात घेण्यास स्थानिकाचा असलेला विरोध

**(४९) ४८९७६ (३१-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भूगाव, भुकूम, पिरंगुट, लवळे, चांदे व नांदे (ता.मुळशी, जि.पुणे) ही गावे पोलिस अधिक्षक कार्यालय, पाषाण, पुणे अतंर्गत पौंड पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पोलिस स्टेशन या गावात झपाट्याने वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या तुलनेत पिंपरी-चिंचवड येथे हलविणे नागरिकांच्या अतिशय गैरसोयीचे होणार असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पाषाण, पुणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातून अन्यत्र हलवू नये यासाठी या गावातील ग्रामसभेत ठराव केला असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२३) :**(१) ,(२), (३) व (४) होय.

पोलीस अधीक्षक,पुणे ग्रा. यांचे अंतर्गत असलेले पौंड पोलीस ठाणे हद्दीतील मौजे भूगांव,भुकूम,पिरंगुट,लवळे,चांदे व नांदे (ता.मुळशी,जि.पुणे) ही गांवे पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांचे कार्यक्षेत्रांतर्गत प्रस्तावित असलेल्या पोलीस ठाणे, बावधन मध्ये समाविष्ट करण्याचे नियोजित होते.

तथापि, वरील सर्व सबंधित गावातील ग्रामपंचायतींनी व ग्रामस्थांनी त्यांची गांवे पोलीस आयुक्त,पिंपरी-चिंचवड यांचे आयुक्तालयात समाविष्ट करण्यास विरोध दर्शविला असल्याबाबत शासनास पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.१२/१/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे कळविले असून, त्याबाबत पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावतीतील गाडगे नगर पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांच्या निलंबनाबाबत

**(५०) ४९२३४ (०१-११-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीतील गाडगे नगर पोलीस स्टेशन मधील पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांनी ॲड.अंकुश काकडे यांना मारहाण व बेकायदेशीर अटक केल्याचे दिनांक २२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदूर बाजार येथील सज्ञान तरुण-तरुणीने रितसर नोंदणी विवाह केल्याच्या प्रकरणी खाजगी चारचाकी वाहनाने पोलिसांनी जाऊन बळजबरीने तरुण-तरुणीला पोलीस स्टेशनमध्ये पकडून महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीत संबंधित तरुणीचा जाबजबाब घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत ॲड.अंकुश काकडे यांनी पोलीसांना बेकायदेशीरपणे व महिला पोलिस कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीत सायंकाळचे वेळी तरुणीचा जवाब घेऊ शकत नसल्याबाबत सांगताच पोलीस निरीक्षक, आसाराम चोरमले यांनी ॲड.अंकुश काकडे यांना बेदम मारहाण व बेकायदेशीरपणे अटक केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची सी.सी.टी.व्ही. फुटेज आणि प्रत्यक्ष साक्षीदार असताना तसेच अमरावती बार असोसिएशनने मारहाण व बेकायदेशीर अटक प्रकरणी निषेध म्हणून एक दिवसीय संप पुकारल्याने पोलीस निरीक्षक, आसाराम चोरमले यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१), (२) (३) हे खरे नाही,

पोलीस स्टेशन, गाडगेनगर येथे महिला पोलीस अंमलदार अनिता लांजेवार यांचेकडे दिनांक ०८/१०/२०२१ पासुन मिसींगचे कामकाज असुन त्यांना मिसींग क्रमांक ५७/२०२२ मधील मुलगी हि चांदुर बाजार येथे असल्याची माहिती मिळाल्याने तिचा शोध घेणेकामी त्या चांदुर बाजार येथे तिच्या वडीलांसह गेल्या असता त्यांना मिसींगमधील मुलगी व तिचे सोबत एक मुलगा पोलीस स्टेशन चांदुर बाजार ला आल्याची माहिती मिळाली. त्यानंतर, श्रीमती लांजेवार या पोलीस स्टेशन चांदुर बाजार येथे आल्यावर त्यांना मुलगी व मुलगा यांनी लग्न केल्याचे सांगितले. तथापि, सदर मुलीबाबत मिसींग तक्रार पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे असल्याने व सदर मुलीने त्या मुलासह पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे येण्याची सहमती दर्शविल्याने त्यांना पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे आणले होते. त्यांना बळजबरीने पकडून आणले नाही.

या दरम्यान ॲड अंकुश तागडे हे पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे आले व मुला-मुलीला कशासाठी पोलीस स्टेशनला आणले, त्यांचे रितसर लग्न झाले आहे, तुम्ही पोलीस स्टेशनला त्यांना त्रास देण्यासाठी आणले काय, असे मोठ्याने बोलून पोलीस स्टेशनची शांतता भंग केली. ॲड अंकुश तागडे यांनी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. ते अनियंत्रित झाल्याने व ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने पोलीस निरीक्षक श्री. चोरमले यांनी ॲड अंकुश तागडे यांना पोलीस कर्मचाऱ्याच्या मदतीने सौम्यबळाचा वापर करुन ताब्यात घेतले. त्यांना मारहाण केली नाही. पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे अप. क्र. ५७५/२०२२ कलम ३५३, १८६, १८९ भादंवि सह ११०, ११२, ११७ मपोका अन्वये दाखल प्रकरणात तपासाअंती सि. सि. क्रं. १८२३/२०२२, दि. १८/०६/२०२२ अन्वये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) सदरहू प्रकरणी चौकशी अंती सत्यता आढळून न आल्याने पोलीस निरीक्षक श्री. आसाराम चोरमले यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.